


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १२, रविवार २४ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# चुरशीच्या लढतीमध्ये काशिनाथ दाते विजयी!

## खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांचा पराभव





पारनेर : प्रतिनिधी

पारनेर नगर मतदारसंघामध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत अखेरच्या फेरीपर्यंत चुरस पहावयास मिळाली. फेरीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे काशिनाथ महादू दाते हे २ हजार ४०६ मतांनी विजयी झाले.त्यांना १ लाख १२ हजार ७७५ मते मिळाली. त्यांच्या प्रतिस्पध उमेदवार राणी लंके यांना १ लाख १० हजार ३६९ यांना मते मिळाली. शनिवारी सकाळी पारनेर शहरातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये सकाळी आठ वाजता मतमोजणीस प्रारंभ झाला. पहिल्याच फेरीपासून काशिनाथ दाते हे आघाडीवर होते. विशेषतः दाते यांचा प्रभाव असलेल्या टाकळी ढोकेश्वर गटामध्ये दाते यांना मतदारांनी चांगला प्रतिसाद दिल्याचे पहावयास मिळाले.

विविध गावांमध्ये दाते व लंके यांच्यात कमालीची चुरस असल्याचे पहावयास मिळाले. नगर तालुक्यातही काशिनाथ दाते यांनी चांगली मते मिळाली. त्या तुलनेत नगर तालुक्यातील उमेदवार संदेश कार्ले यांना अपेक्षेइतकी मते मिळाली नाहीत. मतमोजणीच्या मध्यापर्यंत दाते यांची मते सुमार सात हजारांपर्यंत गेल्यानंतर पुढे त्यांची ही आघाडी कमी होत गेली आणि प्रत्येक फेरीगणीक निकालाची उत्कंठा वाढत गेली.

### औटी, कार्लेसह १० उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त

विधानसभेचे मा. उपाध्यक्ष विजयराव औटी यांनी या निवडणूकीत अपक्ष उमेदवारी केली होती. राज्याचे राजकारण गढूळ झाले असून निवडणूकीनंतर अपक्ष आमदारांची भुमिका महत्वाची ठरणार असल्याचे सांगत सुज्ञ मतदार आपल्या पाठीशी उभे राहतील अशी साद त्यांनी घातली होती. मात्र मतदारांनी त्यांना साफ नाकारले. त्यांना केवळ २ हजार ४६४ मते मिळाली. शिवसेनेचे बंडखोर उमेदवार संदेश कार्ले यांना १० हजार ६४५ मते मिळाली. त्यामुळे औटी, कार्ले यांच्यासह इतर आठ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या.

### पिपाणीचा फटका लंके यांना

लोकसभा निवडणूकीप्रमाणे विधानसभा निवडणूकीतही पिपाणी चिन्हाचा फटका राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवार राणी लंके यांना बसला. पिपानी चिन्हावर उभे असलेले उमेदवार तीन हजार ५७२ मते मिळाली.

### दाते समर्थकांचा जल्लोष, विजयी मिरवणूक

काशिनाथ दाते हे अखेरच्या फेरीत विजयी झाल्याचे निश्चित झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेर एकच जल्लोष केला. गुलालाच उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करीत दाते समर्थकांनी महायुतीच्या नेत्यांच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या. डीजेच्या तालावर तरूणाई नृत्य करीत आनंदोत्सव साजरा करत होती. दरम्यान मिरवणूकीने पारनेरच्या बाजारतळावर आल्यानंतर तिथे सभा सुरू करण्यात आली. मात्र उत्साही कार्यकर्त्यांकडून वारंवार डिजे लावण्यात येत असल्याने वक्त्यांची भाषणे उपस्थितांना ऐकता आली नाहीत.

### विविध उमेदवारांना मिळालेली मते पुढीलप्रमाणे

अविनाश पवार मनसे ९६८, काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार १ लाख १२ हजार ७७५ , राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार १ लाख १० हजार ३६९, भाऊसाहेब बाबाजी जगदाळे १ हजार ७१, सखाराम मळू सरक ३ हजार ५७२, अविनाश उत्तम थोरात ३७४, विजय सदाशिव औटी ८५८, संदेश तुकाराम कार्ले १० हजार ६४५ , प्रविण सुभाष दळवी १४२, भाऊसाहेब माधव खेडकर ७६५, रविंद्र विनायक पारधे ९५४, विजयराव भास्करराव औटी २ हजार ४६४, नोटा ९३९ एकूण मतदान ३ लाख ५० हजार ३५० झालेले मतदान २ लाख ४५ हजार ८९६ काशिनाथ दाते विजयी

### फेरी क्र. १

अविनाश पवार मनसे ३५
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ५१४३
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३६३६
सखाराम सरक रासप १२७
संदेश कार्ले १६
विजयराव भा. औटी ११९
नोटा ३२

### फेरी क्र.२

अविनाश पवार मनसे २६
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४२८३
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४१७८
सखाराम सरक रासप २४१
संदेश कार्ले ३३
विजयराव भा. औटी ७५
नोटा ३३

### फेरी क्र.३

अविनाश पवार मनसे ५५
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ३९९२
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३६९४
सखाराम सरक रासप ५००
संदेश कार्ले २५३
विजयराव भा. औटी ५५
नोटा ५०

### फेरी क्र. ४

अविनाश पवार मनसे ४८
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४२४६
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३५८३
सखाराम सरक रासप १९२
संदेश कार्ले १७८
विजयराव भा. औटी ३९
नोटा ४३

### फेरी क्र. ५

अविनाश पवार मनसे ३८
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४५८८
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४७२६
सखाराम सरक रासप १३३
संदेश कार्ले ५२
विजयराव भा. औटी ५७
नोटा ३७

### फेरी क्र. ६

अविनाश पवार मनसे २४
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४६६१
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३९०७
सखाराम सरक रासप ७६
संदेश कार्ले ४२
विजयराव भा. औटी ५६
नोटा ३४

### फेरी क्र. ७

अविनाश पवार मनसे २७
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४८८३
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४४२२
सखाराम सरक रासप १३३
संदेश कार्ले २९२
विजयराव भा. औटी ३७
नोटा २०

### फेरी क्र. ८

अविनाश पवार मनसे ६८
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ५२५२
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४१७९
सखाराम सरक रासप १६४
संदेश कार्ले ५८१
विजयराव भा. औटी २६
नोटा ६८

### फेरी क्र. ९

अविनाश पवार मनसे ४५
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४८४८
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३९३२
सखाराम सरक रासप १५९
संदेश कार्ले ७५२
विजयराव भा. औटी ३१
नोटा ५४

### फेरी क्र. १०

अविनाश पवार मनसे २५
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४१११
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४३६२
सखाराम सरक रासप १२७
संदेश कार्ले ३१९
विजयराव भा. औटी ७५
नोटा ३४

### फेरी क्र. ११

अविनाश पवार मनसे ३३
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४०४४
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३५५०
सखाराम सरक रासप ७३
संदेश कार्ले ३३
विजयराव भा. औटी ६९
नोटा २४

### फेरी क्र. १२

अविनाश पवार मनसे ६५
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४०२१
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४६१०
सखाराम सरक रासप १०२
संदेश कार्ले १८
विजयराव भा. औटी १२३
नोटा ४२

### फेरी क्र. १३

अविनाश पवार मनसे ३५
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४६८०
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३५४२
सखाराम सरक रासप ८४
संदेश कार्ले २८
विजयराव भा. औटी २५६
नोटा ३२

### फेरी क्र. १४

अविनाश पवार मनसे ३२
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४९८३
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४००९
सखाराम सरक रासप ११५
संदेश कार्ले २९७
विजयराव भा. औटी ७९२
नोटा ४१

### फेरी क्र. १५

अविनाश पवार मनसे ३८
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार २६०६
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४०५५
सखाराम सरक रासप १०४
संदेश कार्ले २२७१
विजयराव भा. औटी २२
नोटा ४०

### फेरी क्र. १६

अविनाश पवार मनसे ३१
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ३९२९
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३३६८
सखाराम सरक रासप ११३
संदेश कार्ले ५७०
विजयराव भा. औटी १३६
नोटा ३४

### फेरी क्र. १७

अविनाश पवार मनसे ३७
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४६३०
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४७५६
सखाराम सरक रासप ९७
संदेश कार्ले १९
विजयराव भा. औटी ४५
नोटा ३४

### फेरी क्र. १८

अविनाश पवार मनसे २८
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ३३५४
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४५१४
सखाराम सरक रासप ११०
संदेश कार्ले ११
विजयराव भा. औटी ४७
नोटा २१

### फेरी क्र. १९

अविनाश पवार मनसे २६
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४०५७
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ५३२४
सखाराम सरक रासप ९७
संदेश कार्ले ४९
विजयराव भा. औटी ६५
नोटा २९

### फेरी क्र. २०

अविनाश पवार मनसे ३६
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ३४५९
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३७५८
सखाराम सरक रासप ७५
संदेश कार्ले १३४२
विजयराव भा. औटी ३६
नोटा ३३

### फेरी क्र. २१

अविनाश पवार मनसे ३ र
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ३३२९
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ३९६६
सखाराम सरक रासप ७३
संदेश कार्ले २०२४
विजयराव भा. औटी ३१
नोटा १६

### फेरी क्र.२२

अविनाश पवार मनसे ३४
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४७८४
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४८९६
सखाराम सरक रासप ९७
संदेश कार्ले ४४
विजयराव भा. औटी ५९
नोटा ३६

### फेरी क्र. २३

अविनाश पवार मनसे २९
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४२७६
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४८९६
सखाराम सरक रासप १००
संदेश कार्ले ७
विजयराव भा. औटी ५९
नोटा ३६

### फेरी क्र. २४

अविनाश पवार मनसे ६०
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४७४२
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४६०८
सखाराम सरक रासप ८६
संदेश कार्ले ४८
विजयराव भा. औटी ३२
नोटा ३५

### फेरी क्र. २५

अविनाश पवार मनसे ३२
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ४०३५
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४३९६
सखाराम सरक रासप १२८
संदेश कार्ले १२७८
विजयराव भा. औटी ७१
नोटा २८

### फेरी क्र. २६

अविनाश पवार मनसे २६
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ५१२९
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४७५३
सखाराम सरक रासप २४८
संदेश कार्ले ६३
विजयराव भा. औटी ६२
नोटा ३६

### फेरी क्र. २७

अविनाश पवार मनसे ३
काशिनाथ दाते राष्ट्रवादी अजित पवार ७१५
राणी लंके राष्ट्रवादी शरद पवार ४६१
सखाराम सरक रासप १८
संदेश कार्ले २५
विजयराव भा. औटी ७
नोटा ५

### टपाली मतदान

काशिनाथ दाते ९७०
राणी लंके १४९९
इतर ५२९

### मतमोजणी केंद्र की खुराडे ?

पारनेर शहरातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील हॉलमध्ये मतमोजणी केंद्र होते. अपुरी जागा असल्याने मतमोजणी प्रतिनिधींना बसण्यासाठीही जागा नव्हती. उभ्या राहिलेल्या प्रतिनिधींना हालचालही करता येत नव्हती. मतमोजणी केंद्र आहे की कोंबडयांचे खुराडे आहे अशी उपहासात्मक चर्चा मतमोजणी प्रतिनिधींमध्ये सुरू होती.

### शौचालयाची दुर्गंधी

मतमोजणी हॉलच्या दारासमोर फिरते शौचालय उभे करण्यात आले होते. त्याची दुर्गंधी मतमोजणी केंद्रात येत होती. केंद्रामध्ये अपुरी जागा असल्याने मतमोजणी प्रतिनिधींना हॉलबाहेर शौचालयाच्या दुर्गंधीमध्येच नास्ता, चहा घेण्याची वेळ आली.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# गिझर घेताय?

**थंडीचा हंगाम सुरू झाला आहे. अशा परिस्थितीत गिझरची मागणीही वाढू लागली आहे. तुम्हीही गीझर घेण्याचा विचार करत असाल तर आम्ही तुम्हाला काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत. त्याच्या मदतीने, कोणते गीझर घ्यायचे हे समजून घेणे आपल्यासाठी सोपे होईल? जेणेकरून तुमच्या खिशावर जास्त भार पडणार नाही आणि नंतर पस्तावे लागणार नाही**



## स्टार रेटिंग तपासा

तुम्ही गिझर खरेदी करणार असाल तर सर्वप्रथम तुम्ही स्टार रेटिंग तपासा. कारण त्याच्या मदतीने कमी वीज वापरणारे उत्पादन खरेदी करणे तुमच्यासाठी सोपे होते.

## स्टारचा खेळ समजून घ्या

तुम्हाला एखादे गिझर आवडले असेल आणि त्याला कंपनीने जास्त तारे दिले असतील, तर त्याचा वापर करताना तुम्ही जास्त वीज वाचवू शकाल. याउलट गीझरला एक-दोन तारेच मिळाले असतील तर ते तितकेसे ऊर्जा कार्यक्षम ठरणार नाही. त्याचा थेट परिणाम तुमच्या बिलावर दिसून येईल. जर तुमचे कुटुंब मोठे असेल तर तारकांची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. कारण मोठे कुटुंब म्हणजे जास्त वापर आणि कमी तारे म्हणजे खिशावर मोठा भार.

## ब्रँडबद्दल माहिती मिळवा

कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उत्पादनाप्रमाणे, गीझर खरेदी करण्यापूर्वी, त्याच्या ब्रँडची माहिती घेणे आवश्यक आहे. कोणता ब्रँड ग्राहक सेवेत कोणत्या सुविधा देत आहे, हमी कालावधी काय आहे, हमी संपल्यानंतर ग्राहक सेवा कशी आहे, इत्यादी माहिती मिळवा.

## सदस्यांनुसार आकार निवडा

गीझर वेगवेगळ्या आकारात येतात, जे लोक त्यांच्या आवडीनुसार आणि सोयीनुसार निवडू शकतात. जर तुमच्या कुटुंबात जास्त सदस्य असतील तर तुम्ही थोडा मोठा गिझर घ्यावा. त्याच वेळी, जर तुमच्या कुटुंबातील सदस्य कमी असतील तर तुम्ही एक छोटा गीझर देखील खरेदी करू शकता.

### तुमच्यासाठी किती लिटर गिझर योग्य आहे?

- सदस्य आकार सूचना (लिटर)
- सिंगल 3 ते 6 लिटर
- 2 व्यक्ती 8 ते 15 लिटर
- 4 व्यक्ती 15 ते 25 लिटर
- 4 पेक्षा जास्त 25 लिटर किंवा अधिक

# BlueSky म्हणजे काय, वापरकर्ते X सोडून त्याकडे का वळत आहेत?

**सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X खूप लोकप्रिय आहे. मात्र, अमेरिकेच्या निवडणुकीनंतर परिस्थिती बदलली आहे. इलॉन मस्कच्या निवडणूक प्रचाराचा परिणाम म्हणून लोक X प्लॅटफॉर्मवरून BlueSky कडे वळत आहेत. BlueSky ॲप जॅक डोर्सीने तयार केले आहे. डॉर्सी यांनी ट्विटर प्लॅटफॉर्म तयार केला होता, जो एलोन मस्कने विकत घेतला होता आणि त्याचे नाव बदलून एक्स केले गेले.**

सोशल मीडिया यूजर्स एलोन मस्कच्या एक्स प्लॅटफॉर्मपासून दूर चालले आहेत. वापरकर्ते X प्लॅटफॉर्मवरून जॅक डोर्सीच्या ब्लूस्काय ॲपवर शिफ्ट होत आहेत. अमेरिकेच्या निवडणूक प्रचारापासून सोशल मीडिया यूजर्स इलॉन मस्ककडे संशयाने पाहत असल्याचे बोलले जात आहे. इलॉन मस्क यांनी अमेरिकेच्या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा दिला होता. तसेच, द्वेषपूर्ण भाषणामुळे बॅन केलेली खाती इलॉन मस्क यांनी अनब्लॉक केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत, मोठ्या संख्येने वापरकर्ते ब्लूस्काय ॲपकडे वळत आहेत.

## BlueSky ॲप म्हणजे काय?

BlueSky हा मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म आहे. BlueSky ॲपची स्थापना जॅक डोर्सी यांनी 2019 मध्ये केली होती. Bluesky वापरकर्त्यांना लघु संदेश पोस्ट करता येतो. यात फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करण्याची सुविधाही देण्यात आली आहे. याशिवाय यूजर डायरेक्ट मेसेज पाठवू शकतात. BlueSky सोशल मीडिया X पेक्षा भिन्न अल्गोरिदम फीड वापरते. BlueSky वापरकर्त्याने केलेल्या पोस्ट तेच लोक बघू शकतात, ज्यांना या वापरकर्त्याने फॉलो केले आहे.

## वापरकर्ते X पासून अंतर का ठेवत आहेत?

BlueSky ची वाढ राजकीय आणि सांस्कृतिक बदलांमुळे झाली आहे. 2024 च्या यूएस





निवडणुकीत ट्रम्प यांच्या सार्वजनिक व्यासपीठावर एलोन मस्कच्या उपस्थितीने खेळ बदलला आहे. अशा परिस्थितीत युजर्स ट्रम्पच्या निषेधार्थ X पासून अंतर ठेवत आहेत. गायक लिझो आणि अभिनेते बेन स्टिलर आणि जेमी ली कर्टिस यांच्यासह सेलिब्रिटी ब्लूस्काय ॲपकडे वळले आहेत.

# तुम्ही यूट्यूबवरून कमाई करू शकता मोठी रक्कम

**सामान्यतः असे मानले जाते की यूट्यूबवर अधिक सब्सक्राइबर असल्याने कमाई होते. पण हे खरे नाही. तुमच्या YouTube चॅनेलवर तुमचे सदस्य कमी असले तरीही तुम्ही पैसे कमवू शकता. विशेष म्हणजे, तुम्ही फक्त ५०० सदस्यांसह कमाई सुरू करू शकता, जर तुमचे चॅनल YouTube पार्टनर प्रोग्राम अंतर्गत रजिस्टर असेल.**

YouTube वरून कमाई करण्यासाठी, प्रत्येक निर्मात्याला YouTube चे नियम माहित असणे महत्वाचे आहे. त्यांचे पालन कसे करावे हे देखील माहित असले पाहिजे. यूट्यूबची सर्वात महत्त्वाची अट म्हणजे तुमचा व्हिडिओ वेगळा असावा. यूट्यूबच्या नियमांमधून पैसे मिळवण्यासाठी, तुमचा व्हिडिओ इतरांपेक्षा वेगळा असणे आवश्यक आहे. तसेच व्हिडिओ आकर्षक




असावा. याचा अर्थ, तुमचा व्हिडिओ पाहणे मनोरंजक असले पाहिजे. सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की आपण काही विशिष्ट प्रकारची सामग्री तयार केली पाहिजे. याचा अर्थ, जर तुम्ही शैक्षणिक व्हिडिओ बनवत असाल तर तुम्हीही असेच व्हिडिओ बनवावेत. कारण Google वैयक्तिकरणावर काम करते. याचा अर्थ जर तुम्हाला टेक व्हिडिओ आवडत असतील तर तुम्हाला असेच व्हिडिओ सुचवले जातील. अशा परिस्थितीत, वापरकर्त्यांसाठी समान प्रकारचे व्हिडिओ बनवणे महत्वाचे आहे. अशा स्थितीत, तुमचे ग्राहक झपाट्याने वाढतील अशी अपेक्षा आहे.

## YouTube सामग्रीकडे लक्ष दिले पाहिजे

YouTube च्या धोरणानुसार चॅनेलची सामग्री तपासली जाते. गुगल कोणत्याही चॅनेलचे सर्व व्हिडिओ तपासते. जेव्हा YouTube तुमचा व्हिडिओ तपासते, तेव्हा तुमची सामग्री तपासली जाते. YouTube प्रथम जाणून घेण्याचा प्रयत्न करते की आपल्या चॅनेलची विशेष सामग्री काय आहे? आणि तुम्ही कोणत्या प्रकारची सामग्री ऑफर करता. तुमचा मजकूर किती अचूक आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. व्हिडिओ मेटाडेटा, ज्यामध्ये शीर्षक, लघुप्रतिमा आणि वर्णन समाविष्ट असावे. तुमच्या चॅनेलच्या 'अबाऊट' विभागाचे पुनरावलोकन केले पाहिजे.

# तुम्ही नवीन स्मार्टवॉच खरेदी करताय?

**स्मार्टवॉच आजकाल स्टाईल स्टेटमेंट बरोबरच आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने एक आवश्यक वस्तू बनली आहे. जर तुम्ही नवीन स्मार्टवॉच खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर सर्वप्रथम तुम्ही तुमच्या गरजा आणि प्राथमिकता लक्षात घेतल्या पाहिजे. स्मार्टवॉच खरेदी करण्याआधी तुम्ही काही गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून तुम्ही तुमच्या गरजेनुसार घड्याळ खरेदी करू शकाल. आवश्यक आरोग्य सुविधांव्यतिरिक्त, तुम्हाला बॅटरी लाईफही लक्षात घ्यावी लागेल.**

तुम्ही नियमितपणे काही शारीरिक कसरत किंवा व्यायाम करत असाल तर तुम्ही हार्ट रेट मॉनिटर, जीपीएस सुविधा असलेले तसेच पाणी आणि धूळ प्रतिरोधक असलेले (वॉटर अँड डस्ट प्रूफ) घड्याळ खरेदी करावे. जर तुम्हाला फक्त स्टायलिश घड्याळ हवे असेल तर तुम्ही स्मार्टवॉचच्या डिझाइन आणि पट्ट्याकडे लक्ष दिले पाहिजे. जर तुम्हाला ब्लूटूथ कॉलिंगची गरज असेल तर तुम्ही चांगला मायक्रोफोन आणि स्पीकर असलेले स्मार्टवॉच खरेदी केले पाहिजे.




## कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी?

स्मार्टवॉच खरेदी करताना हार्ट रेट मॉनिटर, ऑक्सिजन लेव्हल मॉनिटर, एक्सेलेरोमीटर, जायरोस्कोप यासारख्या सेन्सर्सकडे लक्ष द्यावे. हे सर्व सेन्सर तुमच्या आरोग्यविषयक माहितीचा फॉलोअप ठेवण्यास मदत करतात. एक स्मार्टवॉच युजर म्हणून, तुम्ही आरामदायी आणि टिकाऊ स्मार्टवॉचचा पट्टा विकत घ्यावा. स्मार्टवॉचमध्ये हेल्थ फीचर्स असल्याने, स्लीप ट्रॅकिंग, स्ट्रेस मॉनिटरिंग यासारख्या फीचर्सकडेही लक्ष दिले पाहिजे. ब्लूटूथ कॉलिंगच्या नावाखाली बाजारात अनेक प्रकारची घड्याळे विकली जातात. यामध्ये, काही ब्लूटूथ कॉलिंग वॉचमध्ये कॉल नाकारण्याची आणि स्वीकारण्याची सुविधा आहे, तर काही स्मार्टवॉचमध्ये तुम्ही फोनप्रमाणे थेट कॉलिंग आणि मेसेजिंग करू शकाल. तुम्ही मोठ्या बॅटरी आकाराचे स्मार्टवॉच खरेदी केले पाहिजे. तथापि, लक्षात ठेवा की मोठ्या आकाराच्या बॅटरीमुळे घड्याळाचे वजन जास्त असू शकते. असे घड्याळ अवजड दिसू शकते.

# व्हॉट्स ॲपने जीमेलसारखे फीचर आणले!

**WhatsApp मेसेज ड्राफ्ट फीचर लवकरच भारतात लाँच होणार आहे. हे वैशिष्ट्य Google च्या मालकीच्या Gmail द्वारे प्रभावित आहे. जीमेलप्रमाणेच व्हॉट्सॲपवरही मेसेज ड्राफ्ट करता येतात. हे वैशिष्ट्य स्वयंचलित मोडमध्ये कार्य करेल. हे वैशिष्ट्य सर्वसामान्यांसाठी खूप उपयुक्त ठरू शकते.**

व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर आणले आहे. या फीचरची अनेक दिवसांपासून प्रतीक्षा होती, जी व्हॉट्सॲपने अखेर आणण्यास सुरुवात केली आहे. असे मानले जात आहे की कंपनी या आठवड्यात हे फीचर सादर करू शकते. WhatsApp चे आगामी फीचर्स टप्प्याटप्प्याने आणले जातील. अशा परिस्थितीत हे नवीन फीचर भारतात आणण्यासाठी थोडा वेळ लागू शकतो, पण प्रश्न असा पडतो की त्याचा फायदा सामान्य वापरकर्त्यांना कसा होईल?




### १०० दशलक्षाहून अधिक सक्रिय वापरकर्ते

सध्या, WhatsApp चे जगभरात 100 दशलक्षाहून अधिक मासिक सक्रिय वापरकर्ते आहेत. व्हॉट्सॲपकडून लवकरच नवीन फीचर आणले जाणार आहे. यामध्ये बिल्ड इन ॲड्रेस बुक आणि कस्टम चॅट लिस्ट सारख्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. अशा नवीन अपडेट्सनंतर व्हॉट्सॲपवर चॅटिंग अधिक चांगले होईल.

## काय फायदा होईल?

व्हॉट्सॲपचे नवीन मेसेज ड्राफ्ट फीचर गुगलच्या मालकीच्या जीमेलसारखे असेल. या फीचरच्या मदतीने अपूर्ण संदेशांचा मसुदा तयार केला जाईल. म्हणजे तुम्हाला तोच मेसेज पुन्हा पुन्हा लिहावा लागणार नाही. वापरकर्ते पूर्वी लिहिलेल्या संदेशात सुधारणा पाठवू शकतात. याआधी अनेकवेळा तुम्ही मेसेज टाइप करायचो आणि नंतर काही कामासाठी दुसरे ॲप उघडायचे, त्यामुळे मेसेज डिलीट व्हायचा. पण नवीन मेसेज ड्राफ्ट फीचर अतिशय सोयीस्कर असणार आहे.

## कसे कार्य करेल?

जेव्हा तुम्ही व्हॉट्सॲपवर मेसेज टाइप करायला सुरुवात करता पण तो पाठवत नाही. आता व्हॉट्सॲपकडून अशा चॅटला बोल्ड ग्रीन लेव्हलच्या मदतीने हायलाइट केले जाईल. तसेच, ड्राफ्टमधील मेसेज पाठवण्याबाबत व्हॉट्सॲपद्वारे अलर्टही पाठवला जाईल, जेणेकरून तुमचा कोणताही अपूर्ण मेसेज चुकणार नाही. तुम्ही WhatsApp वर स्क्रोल कराल तेव्हा तुम्हाला प्रथम ड्राफ्ट




चॅट दिसतील. अशा प्रकारे तुम्ही अपूर्ण गप्पांना पुन्हा भेट देऊ शकाल. तसेच, जर तुम्हाला ते पाठवायचे नसेल, तर तुम्ही ते ड्राफ्ट सूचीमधून काढून टाकू शकता.

# वर्ष २०४० मध्ये चंद्रावर!

**भारतीय अवकाश संशोधन केंद्र म्हणजेच इस्रो हा भारताचा मानबिंदू असून भारतीयांसाठी अभिमान वाटणारी संस्था आहे. 'इस्रो'ची स्थापना १९६२ मध्ये झाली. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी उद्याच्या भविष्यात अवकाश मोहिमांत भारताचा सहभाग उत्तरोत्तर वाढत जाईल, असे स्वप्न पाहिले होते. महान शास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई यांच्यावर अंतराळ संशोधन कार्यक्रमाची धुरा सोपविण्यात आली. यानुसार भारतीय राष्ट्रीय अवकाश संशोधन समितीची स्थापना झाली. कालोघात तिचे कार्यक्षेत्र वाढत गेले आणि तिची जागा 'इस्रो' संस्थेने घेतली. अवकाश क्षेत्रात संशोधनात आघाडी घेणाऱ्या या संस्थेने गेल्या तीन-चार दशकांत एकाहून एक सरस कामगिरी केली आहे. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अपुरी साधने असूनही अत्यंत कमी खर्चात स्वदेशी तंत्रज्ञानाच्या बळावर या संस्थेने जगातील नामांकित अवकाश संस्थेशी स्पर्धा केली आहे.**




एकवेळ जेव्हा साधनांची कमतरता होती तेव्हा रॉकेटला बैलगाडीने नेले जात होते. भारतीय शास्त्रज्ञ दररोज दुपारचे जेवण रेल्वे स्थानकानवर घेत असत. पण आता 'इस्रो'ने देश आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी विकसित केल्या जाणाऱ्या अवकाश विज्ञानाला नवी ओळख दिली आहे. 'इस्रो'कडे दळणवळण उपग्रहांचा संच असून आगामी काळात देशातीलच नाही तर जगभरातील गरजू देशांच्या दळणवळणाची गरज भागविण्याचे काम करत आहे. प्रसारण, दळणवळण, हवामानाचा अंदाज, आपत्ती व्यवस्थापन उपकरण, भौगोलिक माहिती व्यवस्था, जलवाहतूक आदी गोष्टींसाठी 'इस्रो'चे विशेष उपग्रह सेवा प्रदान करताहेत.

## इस्रोच्या नव्या मोहिमा कोणत्या?

- आता भारताने अवकाश मोहिमांच्या तारखांची घोषणा केली. 'इस्रो'चे प्रमुख एस. सोमनाथ यांनी मानवी अवकाश मोहीम गगनयान २०२६ मध्ये सुरू होण्याची शक्यता वर्तविली. त्याचबरोबर चंद्रावरून नमुने आणण्यासाठी २०२८ मध्ये चांद्रयान-४ अवकाशात झेपावणार आहे. भारत आणि अमेरिकेची ही संयुक्त मोहीम २०२५ मध्ये कार्यान्वित होईल, तर चांद्रयान मोहीम-५ ही जपानच्या अवकाश संस्थेंसह तडीस नेली जाईल.
- चांद्रयान-५ च्या माध्यमातून पाठविण्यात येणारा रोव्हर हा ३५० किलोचा असेल. २०४० पर्यंत चंद्रावर माणूस पाठविण्याची 'इस्रो'ची योजना आहे. वास्तविक, इस्रोच्या प्लॅनिंग कमिटीकडून मानवी अंतरिक्ष मोहिमेला २००४ मध्येच मान्यता देण्यात आली होती आणि तेव्हापासूनच अशा मिशनची तयारी सुरू झाली होती. सप्टेंबर महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने चार महत्त्वाच्या अंतराळ मोहिमांना मंजुरी दिली. यामध्ये चांद्रयान-४, व्हीनस ऑर्बिटर मिशन, भारतीय अंतरिक्ष स्टेशनची निर्मिती आणि गगनयान यांचा समावेश होता.

## मोहिमांचा उद्देश

मोहिमांचा उद्देश अवकाश संशोधन आणि तंत्रज्ञानामध्ये भारताच्या स्थानाला चालना देणे, आपल्या अंतराळ क्षमता वाढविण्याच्या आणि जागतिक अवकाश संशोधन प्रयत्नांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी देशाचे समर्पण अधोरेखित करणे आहे. भारताच्या अवकाश क्षेत्राची अजूनही व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. कारण जागतिक पातळीवर अवकाश क्षेत्रात 'इस्रो'चे योगदान केवळ दोनच टक्के आहे. एका दशकात तो वाढवून किमान १० टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे आता खासगी क्षेत्रही अवकाश क्षेत्रात गुंतवणूक करण्यात रुची दाखवत आहेत. आज 'इस्रो'कडे शास्त्रज्ञांची मोठी टीम आहे आणि अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे नेतृत्व महिला शास्त्रज्ञ करत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक सार्वजनिक उपक्रम अपयशी ठरले गेले, मात्र 'इस्रो'ने अवकाश क्षेत्रात भारताचा दबदबा वाढविला आहे. 'इस्रो'चे महत्त्व अमेरिकी अवकाश संस्था 'नासा' देखील नाकारत नाही.



## शॉर्ट न्यूज

### संगमनेरची श्रेया शिंदे महाराष्ट्र संघात

■ **संगमनेर :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) यांच्या १५ वर्षातील मुलींच्या महाराष्ट्र संघाची घोषणा झाली आहे. या संघात संगमनेर येथील सह्याद्री विद्यालयातील इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी श्रेया सुनील शिंदे हिची निवड झाली आहे. बीसीसीआय आयोजित १५ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या मुलींचा संघ जाहीर झाला असून सदर संघ २१ ते २९ नोव्हेंबर ओडीसा येथे महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.श्रेया शिंदे उत्तम फिरकी गोलंदाज आहे. श्रेयाला तिच्या वडिलांना असलेल्या क्रिकेटच्या आवडीमुळे क्रिकेट खेळण्याची प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. या निवडीचेसर्व श्रेय शिंदे कुटुंबाने मालपाणी हेल्थ क्लबचे डायरेक्ट गिरीश मालपाणी व मालपाणी परिवाराला दिले आहे. श्रेयाला महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव संतोष बोबडे, मुख्य प्रशिक्षक योगेश खरात, सहशिक्षक अदिप वाघ, अभिषेक कदम, प्रथमेश हसे, परभणी जिल्ह्याचे प्रशिक्षक बोरफळे, सुहास पावडेयांचे मार्गदर्शन लाभले.

### खासदारांच्या पत्राला केराची टोपली

■ **श्रीगोंदा :** एसटी महामंडळाच्या श्रीगोंदा आगारात कार्यरत असणाऱ्या महिला वाहकांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. कामाच्या ड्युटीचे अयोग्य नियोजन, दुर्गम भागातील रूटवर बस नादुरुस्त होणारी अडचण, स्वतःच्या संरक्षणासोबत एसटीच्या बसची जबाबदारी कशी घ्यावी, रात्रीच्या ड्युट्या, आगारात रात्रीच्यावेळी मुक्कामाची नसणारी व्यवस्था, एसटीच्या विश्रामगृहाची झालेली दुरवस्था आदी प्रश्नांमुळे महिला वाहक त्रस्त आहेत. दरम्यान, याबाबत खा. नीलेश लंके यांनी महिला कर्मचाऱ्यांना एसटीच्या व्यवस्थापनाने सुविधा देण्याचे पत्र दिलेले आहे.

### बिटक्वॉईन फसवणूक प्रकरणी गुन्हा

■ **श्रीरामपूर :** डॉ. राम मोहनलाल कुकरेजा यांना जादा व्याजाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बिटकॉइन घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशावरून शहर पोलिस ठाण्यात आरोपींवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. डॉ. कुकरेजा यांची पुण्यातील अमित भारद्वाज नावाच्या व्यक्तीशी फोन व ऑनलाइनद्वारे ओळख झाली होती. त्याने कुकरेजा यांना संपर्क करून माझी जीबी मायनिंग कंपनी असून माझ्याकडे तुमच्याकडील बिटकॉइन इन्व्हेस्ट केले, तर तुम्हाला त्यापेक्षा जादा बिटकॉइन देईन असा विश्वास दिला.

### मामा भाच्याचा नदीपात्रात बुडून मृत्यू

■ **पाचेगाव :** प्रवरा नदीपात्रात मामा-भाच्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना पाचेगाव येथे घडली. स्थानिक तरुणांच्या मदतीने दोघांचेही मृतदेह बाहेर काढण्यात आले. पाचेगाव येथील किरण सुरेश देठे (वय २८) व त्याचा भाचा अनुज प्रवीण भालेराव (वय अंदाजे १०) रा. खोसपुरी ता. नगर हे अंघोळीसाठी प्रवरा नदीवर गेले होते. या दोघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अनुज भालेराव हा मुलगा नुकताच आपल्या आई-वडिलांसोबत मामाच्या गावाला दिवाळी सणासाठी आलेला होता.

# भाजप कार्यकर्त्यांनी रक्ताचे पाणी केले

## महायुतीच्या शपथविधीला येण्याचे फडणवीसांकडून अग्रीम आमंत्रण



**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील विजयाकरीता ज्या कार्यकर्त्यांनी आपल्या रक्ताचे अक्षरशः पाणी केले, त्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात विजयाचा जल्लोष साजरा केला. राज्यातील अभुतपूर्व विजयानंतर प्रदेश भाजपच्या मुख्यालयात देवेंद्र फडणवीस यांचा पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. महाराष्ट्राच्या जनतेने पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवला असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. आम्ही मोदींच्या पाठीशी असल्याचे महाराष्ट्राच्या जनतेने दाखवून दिले, असे देखील ते म्हणाले. महाराष्ट्राच्या जनतेसमोर आम्ही साष्टांग दंडवत घालत असल्याचे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे.**

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये फेक नरेटीव्हला आम्ही योग्य उत्तर देऊ शकलो नाही. त्यामुळे या महाराष्ट्रात आम्हाला आवश्यक असलेले यश मिळाले नाही. हा संपूर्ण देश नरेंद्र मोदी यांच्या सोबत असताना आम्ही चुकलो हे दुःख आम्हाला होते. देश मोदींसोबत जात असताना महाराष्ट्रात त्यांना अपेक्षित पाठिंबा मिळवून देऊ शकलो नाही. त्याच वेळेस आम्ही या फेक नरेटीव्हला उत्तर देण्याचे आम्ही ठरवले होते. आणि आता तसे उत्तर देऊन दाखवले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

या सर्वांत राष्ट्रहिताच्या, राष्ट्र प्रेमाने ओतप्रोत झालेल्या सर्व संघटनांचे आम्ही आभार मानत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ज्या फोर्सेस भारत जोडोच्या नावाने लोकांना तोडण्याचा प्रयत्न करत होते, महाराष्ट्र राज्यात अराजकतेचे बीजारोपण करत होते. त्यांच्याविरुद्धही लढाई सुरू झाली आणि सर्व राष्ट्रवादी एकत्र आले. त्यांचीच राज्यात हे चालू शकत नसल्याचे दाखवून दिले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. त्यामुळे या सर्व राष्ट्र विचारांच्या संघटनांचे आभार देखील त्यांनी मानले.

**लाडक्या बहिणींचे आभार**

ज्या लाडक्या बहिणींनी महायुतीला आणि भारतीय जनता पक्षाला मोठा आशीर्वाद दिला, त्या सर्वांचे देखील आम्ही आभार मानत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ज्या लाडक्या बहिणींनी आम्हाला मतदान केले, ज्या लाडक्या शेतकऱ्यांनी आम्हाला मतदान केले, त्या सर्वांचे आम्ही आभार मानत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांनी खऱ्या अर्थाने आम्हाला जो आशीर्वाद दिला, त्यांचे देखील फडणवीस यांनी आभार मानले. फेक नरेटीव्हच्या माध्यमातून त्यांना भडकवण्याचा प्रयत्न केला जात होता. तो प्रयत्न राज्यातील शेतकऱ्यांनी धुडकावून लावला असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**मोदींचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला**

एक है तो सेफ है हा संदेश देशाच्या प्रधानमंत्र्यांनी दिला. त्यामुळे सर्वच समाजातील लोकांनी हा संदेश समजून घेतला. जाती-जातीमध्ये विभागले गेलो तर नुकसान झाले असते. त्यामुळे आपल्याला एकत्रच व्हावे लागेल. हा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवला. त्यामुळेच सर्व समाज एकवटून आपला विजय झाला असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. महायुतीचा विजय हा है तो सेफ है या मोदीजींच्या संदेशाची कमाल असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. या ठिकाणी ज्या प्रकारे तृष्टीकरण करण्याचा प्रयत्न चालू होता. एक वेगळ्या पद्धतीने एका विशिष्ट समाजाला एकत्रित करून त्या माध्यमातून निवडणुका जिंकू असा दावा केला जात होता. त्या विरोधात महाराष्ट्राच्या जनतेने कौल दिला असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

# रावसाहेब दानवेंचा आनंद द्विगुणीत !

## ■ भोकरदनमधून मुलगा, तर कन्नडमधून मुलगी विजयी ■ उद्धव ठाकरेंवर साधला निशाणा

**भोकरदन : प्रतिनिधी**



**भोकरदन विधानसभा मतदारसंघातून मुलगा संतोष दानवे कन्नड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना संजना जाधव विजयी झाल्या. राज्यात ज्या दोन नेत्यांचे दोन्हीही मुले विजयी झाले, त्यात नारायण राणे यांच्या नंतर मराठवाड्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे हेही यावेळी भाग्यवान ठरले आहेत. मुलगा संतोष दानवे यांनी भोकरदन विधानसभा मतदारसंघातून जोरदार विजय मिळवून हॅट्रिक केली. तर पहिल्याच वेळेस कन्नड विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे तिकीट घेऊन रावसाहेब दानवे यांची मुलगी संजना हर्षवर्धन जाधव यांनीही मोठा विजय मिळवला आहे.**

या विजयावर प्रतिक्रिया देताना रावसाहेब दानवे यांनी सांगितले की, गेल्या वेळी २०१९ ला युती निवडून आली होती. मात्र उद्धव ठाकरे यांनी असंगाशी संग केला. अनैसर्गिक सरकार स्थापन केले व राज्यात अडीच वर्षे सत्ता उपभोगली. जनतेला त्यांचा हा निर्णय मान्य नव्हता, म्हणून यावेळी जनतेने त्यांना साफ नाकारले आहे. महायुतीच्या सर्व नेत्यांनी संघटितपणे राबविलेली प्रचार यंत्रणा व अडीच वर्षाच्या काळात महायुतीच्या सरकारने केलेली लोकाभिमुख विकासाची कामे, यामुळे जनतेने विश्वास ठेवून पुन्हा एकदा भाजप- शिवसेना महायुतीला विजय मिळवून दिला आहे. या विजयाचे सर्व श्रेय सर्वसामान्य जनता व कार्यकर्त्यांना जाते. त्यांचा विश्वास व त्यांनी सर्व स्तरातून दिलेला पाठिंब्यामुळे महायुती मोठा विजय साजरा करू शकली आहे.

**भाजपचा गड कायम राखला**

भोकरदन विधानसभा मतदारसंघात आम्ही लोकसभेला अवघ्या साडेआठशे मतांनी पिछाडीवर गेलो होतो. मात्र विधानसभेच्या निवडणुकीत सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम करून जोरदार प्रचार यंत्रणा राबविली. भोकरदन हा भाजपचा गड आहेच. तो गड २० हजार पेक्षा जास्त मताधिक्य मिळून पुन्हा आम्ही कायम ठेवला आहे. ही निवडणूक कार्यकर्त्यांनी जिंकली आहे, असेही रावसाहेब दानवे यांनी सांगितले.

**संजना जाधवच्या प्रचारासाठी एक दिवस गेलो**

कन्नड विधानसभा मतदारसंघात संजना जाधव यांच्या प्रचाराला मी फक्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले त्या दिवशी सभेच्या वेळी गेलो होतो. तेथील निवडणूक ही महायुतीच्या सर्व नेत्यांनी मिळून व कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रचार यंत्रणेमुळे जिंकली आहे, असेही रावसाहेब दानवे यांनी सांगितले.

# माझा मुलगा मुख्यमंत्री होणार !

## देवेंद्र फडणवीसांना आई सरिता यांच्या खास शुभेच्छा

**नागपूर : प्रतिनिधी**



**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्रातील भाजप आणि महायुतीच्या विजयाचे शिल्पकार मानले जात आहेत. या विजयानंतर देवेंद्र फडणवीस यांना त्यांची आई सरिता फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या. माझा मुलगा मुख्यमंत्री व्हावे, ही राज्यातील जनतेची इच्छा असल्याचेही सरिता फडणवीस यांनी म्हटले आहे.**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भारतीय जनता पक्षाचे राज्यातील सर्वात मोठे नेते मानले जातात. त्यांच्या नेतृत्वातच भारतीय जनता पक्ष महाविकास आघाडीच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढली आणि मोठा विजय मिळवला आहे. भारतीय जनता पक्षाचा हा आजपर्यंतचा सर्वात मोठा विजय मानला जात आहे. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे पुढचे मुख्यमंत्री असतील, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे. त्यांच्या नागपूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून देखील देवेंद्र फडणवीस यांनी मोठा विजय मिळवला आहे.

या निकालामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे पुन्हा सीएम पदावर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे त्यांच्यावर सध्या देशभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यात आता त्यांच्या आई सरिता फडणवीस यांनी देखील देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या. या निवडणुकीत भाजपाचा स्ट्राइक रेट हा ८४ टक्के पाहायला मिळाला. फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपला तिसऱ्यांदा सर्वाधिक बहुमत मिळाले आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व अबाधित राहिले आहे. उद्धव ठाकरे सोबत नसताना देखील दुसऱ्यांदा देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्ष राज्यातील सर्वात मोठा पक्ष असल्याचे सिद्ध केले आहे

# मतदान महाराष्ट्राने केले की ईव्हीएमने ?

## शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होत असून कोणाची सत्ता येणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. महायुतीकडून विजयाचा जल्लोष साजरा केला जात आहे. या दरम्यान ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांची प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. निवडणुकीत अपेक्षित असे निकाल आले नाही. महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने मतदान केले, हा मोठा प्रश्न आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले.**

आदित्य ठाकरे म्हणाले की, आम्हाला लोकसभा निवडणुकीत याच महाराष्ट्राने आशीर्वाद दिले. संपूर्ण महाराष्ट्रात जनता महाविकास आघाडीसोबत असल्याची लाट दिसत होती. पण जे निकाल सर्वांना अपेक्षित होते, ते आले नाही. यंदाच्या निवडणुकीत ईव्हीएमने किती प्रचार केला हे पहावे लागेल. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने मतदान केले, हा मोठा प्रश्न आहे.



निकालावर लवकरच सविस्तर बोलू आदित्य ठाकरे म्हणाले, निष्ठावंत म्हणून जिथे काम केले तिथे विजय झाला आहे. पण महाराष्ट्रातील आलेला निकाल पाहता, आपल्याला अपेक्षित असे निकाल आलेले नाहीत. आता निकालाचा आढावा घेत असून त्यावर लवकरच बोलू. या सगळ्यावर बोलण्यासाठी उद्धव ठाकरे लवकरच पत्रकार परिषद घेतील.

**खात्री असलेल्या ठिकाणीही अनपेक्षित निकाल आले**


काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांच्या पराभवावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, ज्या ठिकाणी लोक आपल्यासोबत आहे, असे शंभर टक्के वाटत होते, तिथेही पराभव झाला. तेथील असा निकाल तरी अपेक्षित नव्हता. त्यामुळे या सर्वांवर टेक्निकल चर्चा होणे गरजेचे आहे. आदित्य ठाकरे वरळीमधून विजयी दरम्यान, आदित्य ठाकरे यांचा वरळी मतदारसंघातून विजय झाला आहे. त्यांना जवळपास ६१ हजार मते मिळाली आहेत. तर शिंदे गटाचे उमेदवार मिलिंद देवरा यांना ५२ हजार १९८ मते मिळाली आहे. या मतदारसंघात संदीप देशपांडे यांना देखील मनसेने उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, त्यांना केवळ १८ हजार मते मिळाली आहेत.

**वाचकांच्या लेखणीतून**

# संत, पंथ आणि ग्रंथ

आपला एक संत (गुरू) असावा. आपला एक पंथ असावा. आपला एक ग्रंथ असावा. असे कीर्तनप्रवचनकार उपदेश करीत असतात. त्यात वावगे असे काहीच नाही. आपल्या आचारात आणि विचारात मेळ घालण्यासाठी या गोष्टी भक्त मंडळींनी पाळल्याच पाहिजेत.

आपल्या वारकरी पंथाचीच गोष्ट घ्या. भक्तांनी गळ्यात तुळसीमाळा घालावी. कपाळावर गोपिचंदनाचा टिळा लावावा. रामकृष्णहरी असा मंत्र जपावा. आषाढीकार्तिकीची वारी करावी. हरिपाठ म्हणावा. असे नियम किंवा परंपरा या वारकरी पंथात गृहित धरलेल्या असतात. आपला एक गुरू असावा. संत नामदेवांनी



विसोबा खेचरांना गुरू केले होते. संत तुकारामांनी बाबाजींना सद्गुरु केले होते. संत कबीरांनी रामानंदांना गुरू केले होते. नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ आदी संतांनाही वारकरी भक्तांनी मार्गदर्शक मानावे. अशीही अपेक्षा असते.

या मंडळींनी संत तुकाराम महाराजांची गाथा, संत ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी ग्रंथ, संत एकनाथांचा भागवत असे ग्रंथ जवळ बाळगावेत. त्यांचे नित्य श्रवणपठण करावे अशी अपेक्षा असते. या ग्रंथांत त्या त्या संतांचे किंवा गुरूचे आचार आणि विचार बीज रूपात दडलेले असतात.

हल्ली बाबा लोकांचा समाजात सुळसुळाट झालेला आहे. असे भोंदू बाबा पूर्वीही होते. म्हणूनच संत तुकारामांनी ऐसे संत झाले कळी। तोंडी तंबाखूची नळी।। असे म्हटले होते. अध्यात्माची नकली दुकाने थाटून हे बाबा लोक समाजातील अडल्यानडलेल्या भोळ्या भक्तांचे आर्थिक आणि भावनिक शोषण करीत असतात. म्हणूनच आपला एक संत, एक पंथ आणि निदान एक ग्रंथ तरी असावा या संतोक्तीला आपण त्याज्य मानू नये. त्यात आदर्श समाजाची स्वप्ने दडलेली असतात.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# विखे पाटलांचा शिर्डीत ऐतिहासिक विजय

## कॉंग्रेसचा सुपडासाफ । प्रभावती घोगरे पराभूत




**शिर्डी :प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल आज लागणार आहे. यातच शिर्डी विधानसभा मतदारसंघाच्या निकालाकडे अवध्या महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सलग सात वेळा शिर्डी मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. यावेळीही भाजपकडून पुन्हा राधाकृष्ण विखे पाटलांनाच रिंगणात उतरवण्यात आले. तर विखे पाटील यांच्यासमोर कॉंग्रेस उमेदवार प्रभावती घोगरे आणि भाजपचे बंडखोर उमेदवार राजेंद्र पिपाडा यांचे आव्हान होते. या अटीतटीच्या लढतीत राधाकृष्ण विखे पाटलांनी विक्रमी आघाडी घेत मोठा विजय संपादन केला आहे.**

शिर्डी विधानसभा मतदारसंघाचा इतिहास पाहता १९९५ पासून विखे पाटील घराण्याचे एकहाती वर्चस्व राहिले आहे. विखे पाटील घराणे हे विठ्ठलराव विखे पाटलांपासून सहकार क्षेत्रात सक्रीय असलेले घराणे. त्यामुळे या घराण्याचे नगर जिल्ह्यात मोठे प्रस्थ आहे. याच्या जोरावरच राधाकृष्ण विखे पाटील ११९५ मध्ये कॉंग्रेसच्या तिकीटावर पहिल्यांदा निवडून आले. तेव्हापासून ते आतापर्यंत पण २०१९ च्या निवडणूक काळात विखे पाटलांनी कॉंग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपचे कमळ हाती घेतले आणि निवडूनही आले. विखे पाटील भाजपकडून दुसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अखेर राधाकृष्ण विखे पाटलांनी बंडखोरीचे आव्हान संपुष्टात आणले आहे. तर कॉंग्रेसच्या प्रभावती घोगरेंना देखील पराभवाची धूळ चारली आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघात एकूण ७४.५२ टक्के मतदान झाले आहे. वाढलेला मतटक्का भाजपच्या उमेदवाराच्याच पथ्यावर पडले आहे. राधाकृष्ण विखे पाटलांना तब्बल ५० हजार ५१७ मतांची विक्रमी आघाडी मिळाली आहे. राधकृष्ण विखे पाटलांच्या पारड्यात यंदा १ लाख २० हजार ४८२ मते पडली आहेत. तर कॉंग्रेसच्या प्रभावती घोगरेंना ६० हजार ९६५ मते मिळाली आहेत. तर भाजपचे बंडखोर उमेदवार राजेंद्र पिपाडा यांना केवळ १ हजार ३९० मते मिळाली आहेत. बंडखोराला घरचा रस्ता दाखवण्यात विखे पाटलांना यश आले आहे. तर कॉंग्रेसच्या उमेदवारावर विखे पाटलांनी ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

# भाजपचा विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व विजय

## फडणवीसांचा मुख्यमंत्री पदाचा मार्ग मोकळा

**मुंबई:प्रतिनिधी**

**राज्यात विधानसभा निवडणुकांचे निकाल लागत आहेत. आतापर्यंत समोर आलेल्या निकालांनुसार महायुतीचं सरकार बनताना दिसत आहे. आतापर्यंत महायुतीने २८८ पैकी तब्बल २२५ जागांवर आघाडी घेतली आहे. त्यामुळे महायुती सत्ता स्थापन करण्याचा रस्ता मोकळा झाला आहे. तर, भाजपने एकट्याने १३० जागां मिळल्याचं चित्र आहे. त्यामुळे या निकालाने सारेच चकित झाले आहेत. कारण, असा निकाल लागेल असं कोणालाही वाटलं नव्हतं.**



या निकालाचं सर्वात मोठं श्रेय हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं जात आहे. कारण, लोकसभेच्या पराभवानंतर फडणवीसांनी मोठ्या मेहनतीने हा विजय खेचून आणला आहे. विजय होईल याची खात्री होती पण इतक्या मोठ्या प्रमाणात उमेदवार विजयी होतील, हे नव्हतं माहीती. हे अपेक्षेपेक्षा खूप जास्त आहे, असं फडणवीसांनी एका चॅनेलशी बोलताना सांगितलं.

या निकालासोबतच आता देवेंद्र फडणवीसांचा पुन्हा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा होताना दिसत आहे. कारण, भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्याने मुख्यमंत्री पद हे भाजपकडे जाण्याची दाट शक्यता आहे. असं झाल्यास मुख्यमंत्रीपदाचे दावेदार हे फडणवीस असल्याची चर्चा जोर धरु लागली आहे. तर, भाजपच्या नेत्यांनीही तशी इच्छा बोलून दाखवली आहे.

दुसरीकडे, देवेंद्र फडणवीसही या विजयाने भारावून गेले आहेत. भाजपचा विजय होताना दिसताच त्यांच्या आईनी त्यांना फोन केला होता. तेव्हा विजयाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. तर, जे फोटो समोर आले आहेत त्यातही फडणवीसांचा आनंद दिसून येत आहे.

यानंतर फडणवीसांनी एक ट्विट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. देवेंद्र फडणवीसांनी ''एक है तो सेफ है. मोदी है तो मुमकीन है'', असं ट्विट केलं आहे. या संपूर्ण निवडणुकीत एक है तो सेफ है चा मुद्दा महायुतीकडून चर्चेत होता.

भाजपने याच मुद्द्यावर निवडणुकीत प्रचार केला होता. त्याचाच देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा एकदा उच्चार केला. विधानसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीने जे अभूतपूर्व यश मिळवलं त्याचं श्रेय त्यांनी नरेंद्र मोदी यांनाही दिलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात सभा घेतल्या होत्या. त्याचाही विधानसभा निवडणुकीत फायदा झाल्याचं पाहायला मिळत आहे.

# लाडक्या बहिणींचा आशीर्वाद; युतीचा वारू चौखूर उधळला




## महाविकास आघाडीचा हिरमोड

**मुंबई :प्रतिनिधी**

**२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने बहुमताचा आकडा पार केला असून राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकारच्या सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.एमव्हीए बहुमताच्या आकड्यापासून कोसो दूर असून महायुतीच्या या विजयात लाडली बहिण योजनेचा मोलाचा वाटा राहिला आहे. या योजनेच्या सुरुवातीलाच विधानसभा निवडणुकीत ही मोठी योजना ठरणार असल्याचे सरकारने जाहीर केले होते.**

अजित पवार गटातील राष्ट्रवादी कॉंग्रेस, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप या महायुती पक्षांनी लाडली बहिन योजनेचा जोरदार प्रचार केला तर या योजनेचा प्रभाव पाहून कॉंग्रेसनेही अशीच योजना जाहीर केली. महायुतीच्या विजयात लाडकी बहिन योजनेचा मोठा वाटा असल्याचा दावा भाजप नेत्यांनी केला आहे.

यावेळी राज्यातील विधानसभा निवडणुकीत एकूण ६६.०५ टक्के मतदान झाले तर, २०१९ च्या तुलनेत यावेळी सुमारे ५% अधिक लोकांनी मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे यावेळी पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या जास्त होती. निवडणूक आयोगानुसार एकूण ६ कोटी ४४ लाख ८८ हजार १९५ मतदारांपैकी ३ कोटी ३४ लाख ३७ हजार ५७ पुरुष आणि ३ कोटी ६ लाख ४९ हजार ३१८ महिलांनी मतदान केले. करवीर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ८४.९६% मतदान झाले तर, कुलाबा विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी ४४.४४% मतदान झाले.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम म्हणाले की, महाराष्ट्रात प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने महिलांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी म्हटले की, आतापर्यंत असं कधीच घडलं नव्हतं. राज्यात प्रथमच महिला मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले त्यामुळे, एकूण मतदानाची टक्केवारी ६६% हून अधिक झाली. चोक्कलिंगम म्हणाले की, गेल्या तीन दशकांत असे घडलेले नाही.

'लाडली बेहन योजना' कारण मानले जात होते. निवडणुकीपूर्वी राज्यभर लाडकी बहीण योजनेची बरीच चर्चा रंगली होती. निवडणूक प्रचारादरम्यान महायुतीने सत्तेत आल्यास 'लाडली बेहन योजने'त दिलेली रक्कम १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले तर लाडकी बहीण योजनेला टक्कर देण्यासाठी कॉंग्रेसनेही 'महालक्ष्मी योजने'अंतर्गत कर्नाटकच्या पार्श्वभूमीवर महिलांना दरमहा ३,००० रुपये आणि महिलांना मोफत बस प्रवासाचे आश्वासन दिले होते. मात्र, महायुतीची चाल महाराष्ट्रात ठप्प झाली आणि महायुतीचा महाराष्ट्रात मोठ्या विजयाच्या फरकाने सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

त्यामुळे आता महिला मतदारांवर प्रभाव टाकण्यात 'लाडली बेहन योजना' खरोखरच यशस्वी ठरली का, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. या योजनेचा थेट फायदा महायुतीला झाला का, याचे उत्तर होय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार करवीर, चिमूर, ब्रम्हपुरी, नेवासा, कागल, आरमोरी, नवापूर, शाहूवाडी, कुडाळ आणि पलूस-कडेगाव विधानसभा मतदारसंघात महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले.

# मनसेची दणदणीत हार, लेकालाही पराभवाचा धक्का

## राज ठाकरेंची तीन शब्दात प्रतिक्रिया

**मुंबई :प्रतिनिधी**

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना मोठा झटका बसला आहे. कारण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला एकही जागा जिंकता आलेली नाही. तर माहीम विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले त्यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांचाही दारुण पराभव झाला. धक्कादायक म्हणजे अमित ठाकरे थेट तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार महेश सावंत यांनी विजयाचा गुलाल उधळला. त्यानंतर राज ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.**



**काय म्हणाले राज ठाकरे?**

''अविश्वसनीय ! तूर्तास एवढेच...'' अशा तीनच शब्दात राज ठाकरे यांनी आपलं म्हणणं मांडलं आहे. एक्स सोशल मीडिया अकाऊण्टवरुन राज ठाकरेंनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली. मनसेने विधानसभेच्या १२८ जागा लढवल्या होत्या. यामध्ये विद्यमान आमदार राजू पाटील आणि अमित ठाकरे यांच्याशिवाय बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, अविनाश जाधव यांचा समावेश होता. मात्र त्यापैकी एकालाही विजय मिळवता आला नाही.

विशेष म्हणजे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला भरघोस विजय मिळून मनसेचा पराभव झाल्यानंतर राज ठाकरे यांनी अनाकलनीय अशी एका शब्दात प्रतिक्रिया दिली होती. आज ठाकरे गटाला पराभवाचा धक्का बसल्यानंतर उद्धव ठाकरेंच्या तोंडीही भावाचाच शब्द पाहायला मिळाला होता.

**माहीममध्ये कोण विजयी?**

दरम्यान, माहीम विधानसभेत ठाकरे गटाचे महेश सावंत विजयी झाले, तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे विद्यमान आमदार सदा सरवणकर दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर अमित ठाकरे यांनी पराभवानंतर फेसबुकवरुन प्रतिक्रिया व्यक्त केली. जनतेचा कौल मान्य असल्याचे अमित यांनी म्हटले आहे.

# अजितदादांनी शरद पवारांच्या विरोधातील लढाई थेट जिंकली !

## पुतण्यावरच मोठ्या फरकाने केली मात

**बारामती : प्रतिनिधी**

**राज्याचे लक्ष लागलेल्याबारामती विधानसभामतदारसंघात अपेक्षेप्रमाणे राज्याचे उपमुख्यमंत्री व महायुतीचे उमेदवार अजित पवार यांनी मविआचे उमेदवार व पुतणे युगेंद्र पवार यांच्यावर मोठ्या फरकाने मात केली. अजित पवार यांनी बारामती जिंकल्याने थेट शरद पवार यांच्याविरोधातील लढाई त्यांनी जिंकल्याचे आता बोलले जात आहे.**



बारामती विधानसभेची निवडणूक यंदा प्रथमच प्रचंड गाजली. गेली सात विधानसभा निवडणूका तसे पाहिले गेले तर अजित पवार यांनी एकतर्फीच जिंकल्या आहेत. परंतु यंदा पक्ष फुटीनंतर अजित पवार यांना घरातूनच कडवे आव्हान उभे राहिले होते. युगेंद्र पवार यांच्या रुपाने सख्या पुतण्यानेच त्यांना आव्हान दिल्याने अजित पवार यांनाही पहिल्यांदाच आमदारकीला प्रचंड घाम गाळावा लागला. अर्थात त्यातून त्यांचा विजय सुकर झाला.

लोकसभेला पत्नी सुनेत्रा पवार यांना खा. सुप्रिया सुळे यांच्या विरोधात पराभव पत्करावा लागल्यानंतर अजित पवार कमालीचे सावध झाले. बारामतीतून सुळे यांना ४८ हजारांचे मताधिक्य मिळाल्याने अजित पवार यांची चिंता वाढली होती. त्यामुळे त्यांनी लोकसभेच्या पराभवानंतर लागलीच कामाला सुरुवात केली. पक्ष बांधणी नव्याने सुरु केली. ज्या पदाधिकाऱ्यां विषयी तक्रारी होत्या, त्यांना विधानसभेवेळी दूर ठेवत सगळी सूत्रे स्वतःच्या हाती घेतली. त्याचा परिणाम त्यांना विजयापर्यंत घेवून गेला.

दुसरीकडे शरद पवार यांनी युगेंद्र याच्या रुपाने अजित पवार यांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला. युगेंद्र यांच्यासाठी शरद पवार, सुप्रिया सुळे, शर्मिला पवार, श्रीनिवास पवार, रेवती सुळे यांनी प्रचाराची धुरा सांभाळली. परंतु अजित पवार यांच्या झंझावातापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. अजित पवार यांचे बारामती तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांवर वर्चस्व आहे, त्याचा फायदा त्यांना या निवडणूकात झाला. लोकसभेवेळी तालुक्यात वाद निर्माण करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना हाताच्या अंतरावर ठेवल्याने त्याचा फायदा अजित पवार यांना झाला. सुप्रिया सुळे या बारामतीतून चौथ्यांदा खासदार झाल्या आहेत. संसदेत त्यांची कामगिरी प्रभावी राहिली आहे. संसदरत्न पुरस्काराने त्या गौरवल्या गेल्या आहेत. त्यामुळे लोकसभेला ताई व विधानसभेला दादा अशी बारामतीतील जनता बोलत होती. तेच निकालातून दिसून आले. अजित पवार यांच्या विकास कामांना बारामतीकरांनी साथ दिल्याचे दिसून आले. लोकसभेला ताईला भरभरून मते देणाऱ्या बारामतीकरांनी अजित पवार यांना मते देताना कोणतीही कुचराई केली नाही. त्यातूनच त्यांचा विजय सुकर झाला.

सुज्ञ बारामतीकर आज फक्त विकासाला प्राधान्य देत माननीय अजितदादा पवार यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहिलेला आहे. कुठल्याही अपप्रचाराला बळी न पडता बारामतीकर व संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेने महायुतीच्या पाठीमागे उभे राहण्याचे ठरविले व भरघोस मतांनी महायुतीचे उमेदवार विजय केल्याच्या प्रतिक्रिया अजित पवार समर्थकांनी दिल्या.

# जनतेने सावत्र भावांना जोडे दाखवले; एकनाथ शिंदे यांची जोरदार टीका

## लोकांनी दाखवून दिले शिवसेना आणि राष्ट्रवादी कोणाची...



**मुंबई :प्रतिनिधी**

**विधानसभेच्या घनघणीत यशानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठे भाष्य केले. त्यांनी विरोधकांचा जोरदार समाचार घेतला. महायुतीच्या नेत्यांकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राच्या जनेतसमोर नतमस्तक होतो. आता आम्हाला राज्यात खूप काम करावे लागेल. सर्वांच्या मनापासून आभार आहे. लोकांनी ही निवडणूक हातात घेतली. काय शब्द वापरावेत मला कळत नाहीये. लोकांनी प्रेमाचा वर्षाव महायुतीवर केलाय. लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी अशा विविध योजना आम्ही आणल्या. मी खरोखर आजच्या विजयासाठी जनतेसमोर दंडवत घेतो.**

राज्यात शिवसेना, भाजपा, एनसीपी आणि इतर घटक पक्षांनी आम्ही मिळून निर्णय घेतले. इतिहासात पहिल्यांदाच असे निर्णय घेण्यात आले. सर्व कामे थांबवण्यात आली होती. ती आम्ही हाती घेतली. कोस्टल रोड, मेट्रो, ज्याचे भूमिपूजन मोदी साहेबांनी केले त्याचे उद्घाटनेही त्यांनी केले. राज्याचा विकास करत असताना आम्ही सर्व घटकांचा विचार केला. अडीच वर्ष आम्ही सर्व कामे वेगाने केली. कल्याणकारी योजना आणल्या.

वीज पंपाचे बिल माफ केले. आजचा दिवस ऐतिहासिक आहे. महाविकास आघाडीने बंद पाडलेल्या कामे आम्ही सुरू केली. दोन अडीच वर्षात आम्हाला केंद्र सरकारने मदत केली. आम्ही काम केल्याने राज्यातील जनतेने कौल दिला. एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, आमच्यावर आरोपही करण्यात आली. आम्ही सगळ्या गोष्टींना सामोरे गेलो. लाडकी बहिणीच्या विरोधात हे लोक कोर्टात गेले. लोकांनी विश्वास ठेवला हे देणारे सरकार आहे फक्त बोलणारे नाही. आम्हाला माहिती होते हे विरोधक सावत्र भाऊ काही अडचण आणतील. आम्ही फक्त कागदावर योजना ठेवल्या नाहीत.

यामुळे लोकांना कळाले की, हे सरकार सर्वसामान्यांसाठी आहे. लोकांनी सुडाचे राजकारण स्वीकारले नाही. लोकसभेत फेक नेरेटिव्ह तयार केला. जनतेने पूर्णपणे विकासाला निवडले आहे. रोज म्हणत होते सरकार पडणार सरकार पडणार. आम्ही त्यांना आरोपाने उत्तर दिले नाही तर कामातून दिले. मी आणि आमचे दोन्ही मुख्यमंत्री २४ तास लोकांसाठी होतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कोणाची आणि शिवसेना कोणाची हे लोकांनी ठरवल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले. विकासाला लोकांनी महत्व दिले. राज्याला पुढे घेऊन जाण्यासाठी एकत्र या असे मोदी साहेबांनी म्हटले, त्यात वाईट काय होते. लाडक्या बहिणींना सावत्र भावांना चांगला जोडा दाखवल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

सकाळी बातम्या पाहून वाटले आमचा कार्यक्रम होतो की, काय. आता आमची जबाबदारी वाढली आहे. लोकांना कल्याणकारी योजना आम्ही देऊ शकलो. विश्वासावर सर्व गोष्टी चालतात लोकांना काहीही सांगा पण विकास दिसतो. जेव्हा जेव्हा शेतकरी अडचणीत आला, त्यावेळी आम्ही त्याच्या मागे उभा राहिलो. आमच्या मागे केंद्र सरकार ताकदीने उभे राहिले. आम्ही आमच्या विजयाचे श्रेय जनतेला आणि आमच्या कार्यकर्त्यांना देतो, ज्यांनी मेहनत घेतली, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

# पुढचा मुख्यमंत्री भाजपचाच !

## महायुती सरकारचा पॅटर्न ठरला । शिंदे, अजित पवारांचं काय होणार?

**मुंबई: प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत महायुतीनं अतिशय दणदणीत विजय मिळवला आहे. महायुतीनं तब्बल २३६ जागांवर यश मिळवलं असून महाविकास आघाडी केवळ ४९ जागांपर्यंत पोहोचली आहे. विशेष म्हणजे भारतीय जनता पक्षानं सलग तिसऱ्यांदा शंभरचा आकडा पार केला आहे. भाजपनं महाराष्ट्रात पहिल्यांदाच १२५ चा आकडा ओलांडला आहे. २०१४ मध्ये मोदी लाट असतानाही भाजपला असा पराक्रम करता आला नव्हता. त्यावेळी भाजपनं १२२ जागा जिंकल्या होत्या. यंदा भाजपनं तब्बल १३७ जागांवर यश मिळवलं आहे. त्यानंतर आता मुख्यमंत्रिपद भाजप आपल्याकडेच ठेवणार आहे.**



महायुतीत सध्या मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री असा पॅटर्न आहे. तोच कायम ठेवण्यात येईल, अशी माहिती एबीपी माझानं सुत्रांच्या हवाल्यानं दिली आहे. सध्याच्या घडीला महायुतीत मुख्यमंत्र्यांच्या जोडीला दोन उपमुख्यमंत्री आहेत. नव्या सरकारमध्येही तशीच रचना असेल. पण मुख्यमंत्री भाजपचा असेल. तिन्ही पक्षाच्या प्रमुख नेत्यांकडे सरकारमधील प्रमुख पदं कायम राहणार आहेत.

२०१४ ते २०१९ या कालावधीत राज्यात भाजप, शिवसेना युतीची सत्ता होती. त्यावेळी भाजपच्या १२२ जागा आलेल्या होत्या. देवेंद्र फडणवीस यांच्या रुपात राज्यात प्रथमच भाजपचा मुख्यमंत्री झाला. ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे ते राज्यातील केवळ दुसरेच मुख्यमंत्री ठरेल. २०१९ मध्ये भाजप, शिवसेनेला बहुमत मिळालं. भाजपला १०५ जागा मिळाल्या. पण मुख्यमंत्रिपदावरुन दोन्ही पक्षांचं बिनसलं आणि उद्धव ठाकरेंनी भाजपची साथ सोडली. ते कॉंग्रेस, राष्ट्रवादीसोबत गेले. त्यामुळे भाजपला विरोधी बाकांवर बसावं लागतं.

२०२२ मध्ये शिवसेनेत उभी फूट पडली. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वात ४० आमदारांनी ठाकरेंची साथ सोडली. भाजपच्या पाठिंब्यानं शिंदे मुख्यमंत्री झाले. सत्ता स्थापनेसाठी भाजपनं मुख्यमंत्रिपदाचा त्याग केला. २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत सर्वात मोठा पक्ष असूनही भाजपला मुख्यमंत्रिपदापासून दूर राहावं लागलं.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप ८० ते ९० जागांपर्यंत मर्यादित राहिली असती, तर पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंकडे मुख्यमंत्रिपद गेलं असतं. पण आता भाजपनं तब्बल १३७ जागांवर यश मिळाल्यानं कार्यकर्त्यांचा दबाव वाढला आहे. बहुमताच्या आकड्याच्या जवळ गेल्यानं मुख्यमंत्रिपद सोडू नये, अशी नेत्यांची, पदाधिकाऱ्यांची भूमिका आहे. त्यामुळे आता पुढील मुख्यमंत्री भाजपचाच असेल.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com